॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव (दि. १२ ) प्रतिनिधी - कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ येथील सेंटर फॉर इनोव्हेशन, इन्क्युबेशन अँड लिंकेजेस (KCIIL) तर्फे आयोजित तीन दिवसीय निवासी 'स्टार्टअप बूटकॅम्प कोहोर्ट ९.०' उत्साहात संपन्न झाला. उत्तर महाराष्ट्रातील युवकांमध्ये उद्योजकता आणि नवोपक्रम संस्कृती रुजविण्याच्या उद्देशाने आयोजित या शिबिरात १७ स्टार्टअप संस्थापकांनी सक्रिय सहभाग नोंदविला.

तीन दिवस चाललेल्या या बूटकॅम्पमध्ये स्टार्टअप क्षेत्रातील विविध पैलूंवर तज्ज्ञांनी सखोल मार्गदर्शन केले. तंत्रज्ञान आणि प्रोटोटाइपिंग, बौद्धिक संपदा हक्क (IPR) आणि पेटंटद्वारे नाविन्याचे संरक्षण, व्यवसाय रणनीती, गो-टू-मार्केट (GTM) रणनीतीचे महत्त्व 'बिझनेस मॉडेल कॅनव्हास' विपणन व आर्थिक नियोजन ब्रँडिंगचे बारकावे तसेच स्टार्टअप निधी, शासकीय योजना आणि कायदेशीर बाबींविषयी तज्ञांनी मार्गदर्शन केले.

या निवासी बूटकॅम्पमध्ये केवळ व्याख्याने न घेता संवादात्मक सत्रे, समूहचर्चा आणि प्रत्यक्ष अनुभवाधारित उपक्रमांवर विशेष भर देण्यात आला. समारोपाच्या सत्रात स्टार्टअप पिचिंग कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या वेळी सहभागींनी आपल्या स्टार्टअप कल्पना तज्ज्ञ समितीसमोर सादर केल्या. समितीने व्यवसाय मॉडेलमध्ये सुधारणा आणि बाजारपेठ विस्तारासंदर्भात महत्त्वपूर्ण सूचना दिल्या.

समारोपप्रसंगी प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे आणि कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांनी उपस्थित राहून सहभागींचे कौतुक केले. तसेच केसीआयआयएलचे संचालक प्रा. अरुण इंगळे, डॉ. राजेश जावळेकर आणि मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. नविन खंडारे यांनी स्टार्टअप्सना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. राज्यातील स्टार्टअप परिसंस्था अधिक सक्षम आणि गतिमान करण्याच्या दिशेने कोहोर्ट ९.०'हा उपक्रम प्रभावी ठरेल, असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला.

.........................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: १२ मे, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता